नमुना दोन

जाक्र जिप/शिक्षण/प्राथ/प्रास-२/वशी - ८०८ / २०२५
शिक्षण विभाग (प्राथ.) जि.प. ठाणे
दिनांक :- 30/06/2025

प्रति,
व्यवस्थापक :- सरस्वती विदयावर्धिनी शिक्षण संस्था
दुरध्वनी :- ८२९११९११७१
ई मेल :- zenithinternationalpk@yahoo.com

**विषय:** - बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम, ११ पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

संदर्भ :- १) शिक्षणाधिकारी नवीमुंबई महानगरपालिका, शिक्षण विभाग, नवीमुंबई जि.ठाणे यांचेकडील जाक्र.नमुंमपा/ शि.वि./१८८९/२०२५ दि. ३०/५/२०२५ रोजीचा प्रस्ताव.

आपल्या दि. ३०/५/२०२५ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला/ पत्रव्यवहार/ शाळेची केलेली तपासणी याआधारे.

मी शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद ठाणे **दि.१/४/२०२५** पासुन ते दि. **३१/३/२०२८** पर्यंत तीन वर्षांच्या कालावधीसाठी **इ.१ ली ते इ.८ वी** करिता झेनिथ इंटरनॅशनल अँण्ड पोटेट किड्स, सेक्टर -५, ऐरोली, नवीमुंबई जि.ठाणे (शाळेचे नाव, पत्यासह) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधीन आहे.**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११(जोडपत्र दोन) मधील तरतुदींचे, शाळा पालन करील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना ,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील त्या विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल अशी प्रतीपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था/ शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही. आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकास प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्रारंभिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.
(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या [illegible] नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना [illegible] किमान अर्हता ५ वर्षांच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/तिची कर्तव्ये शिक्षक [illegible]
(आठ) शिक्षकाने/ शिक्षकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेवू नये. [illegible]

NOTARY
SUJATA Y. JOSHI
Dist. Thane (M.S.)
Regn. No. 10293/13
14/09/2028
GOVT. OF INDIA

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमांचे पालन करील.

९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या-:

| | |
|---|---|
| * शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | :- १०६१३.६३ Sq.mt. |
| * एकुण बांधकाम क्षेत्र | :- ४१९२.२८ Sq.mt. |
| * खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | :- ६४२१.३५ Sq.mt. |
| * वर्ग खोल्या संख्या | :- ५९ |
| * कार्यालय- नि- भांडार-नि- मुख्याध्यापकाची खोली | :- १४ |
| * मुलांसाठी व मुलींसाठीह स्वतंत्र प्रसाधनगृहे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल.- | :- आहे |
| * पिण्याच्या पाण्याची सुविधा | :- आहे |
| * दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | :- लागू नाही |
| * अध्यापन अध्ययन साहित्य/ खेळ व क्रिडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता | :- आहे |
| * वाचन साहित्य विनासायास उपलब्ध. | :- आहे |

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्याच्या विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०(१८६०चा २१) किंवा मुंबई सार्वजनीक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १२५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक TH- NMMC-P- 7 असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपया तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तींची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किं स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

२०. मुख्याध्यापक झेनिथ इंटरनॅशनल अँण्ड पॉटेट किड्स, सेक्टर -५, ऐरोली, नवीमुंबई जि.ठाणे यांनी त्यांच्या शाळेस आरटीई पुनर्मान्यता नमुना नंबर २-मिळणेबाबत प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रकांबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार उदभवल्यास अथवा खोटी व दिशाभूल करणारी कागदपत्रक आढळून आल्यास या कार्यालयाकडुन देण्यात आलेले आरटीई पुनर्मान्यता नमुना नंबर २-रद्द समजण्यात येईल.

(बाळासाहेब राक्षे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद ठाणे

NOTARY
SUJATA V. JOSHI
Dist. Thane (M.S.)
Regn. No. 10293/13
Expiry Dt. 24/09/2028
GOVT. OF INDIA

Sample Two

O.No. TZP/Education/Pri/PS-2/VS-808/2025
Education Department (Pri.) Z. P., Thane
Date :- 30/06/2025

To,
Manager:- Saraswati Vidyavardhini Education Society
Phone No.:- 8291191171
Email :- zenithinterantionalpk6@yahoo.com

NOTARY GOVT. OF INDIA

Subject:- Regarding the grant of recognition certificate to schools under Rule 11 sub-rule (4) of the Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011 for the purpose of section 18 of the Right of Children to Free and Compulsory Education Act 2009.

Reference :- 1) Proposal from Education Officer, Navi Mumbai Municipal Corporation, Education Department, Navi Mumbai, Dist. Thane O.No. NMMC/E.D./1889/2025 dt. 30/05/2025.

Based on your application dated 30/05/2025 and subsequent correspondence with the school/ inspection of the school in this regard,

I Education Officer (Pri.), Zilla Parishad Thane is provisionally approving school Zenith International and Petite Kids, Sector- 5, Airoli, Navi Mumbai, Dist. Thane (name of school, including address) for **Std 1st to Std 8th** for Three years period from **01/04/2025 to 31/03/2028.**

The above approval is subject to the fulfillment of the following conditions.

1) The period of recognition shall not be extended and there shall be no obligation under any circumstances to grant recognition or affiliation after Class VIII.

2) The school shall comply with the provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 (Annexure One) and the Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education Rules 2011 (Annexure Two).

3) The school shall admit children belonging to the nearest weaker sections and disadvantaged groups in the first grade, to the extent of at least 25% of the number of students in that grade, and shall

provide free and compulsory education to them till the completion of primary education, provided further that this standard shall be complied with in the case of pre-primary grades also.

4) A separate bank account shall be provided to the school for receiving the reimbursement for the children referred to in paragraph 3 as per section 12 (2) of the Act.

5) The Institute/School will not charge any capitation fee. and shall not compel the child or his or her parent or guardian to undergo any screening procedure.

6) No child shall be denied admission to school for want of proof of age, religion, caste or race, place of birth or any of these.

7) (One) No child admitted to school shall be held back in the same grade as he is or expelled from the school till the completion of elementary education.
(Two) No child shall be subjected to corporal punishment or mental torture.
(Three) No child shall be required to pass any board examination till completion of elementary education.
(Four) Every child who has completed elementary education shall be given the certificate prescribed under rule 23.
(Five) Disabilities / special needs students with will be included as per the provisions of the Act.
(Six) Teachers possessing the minimum qualification prescribed under Section 23(1) of the Act shall be appointed. But further, the teachers who do not hold the minimum qualification on the date of commencement of the Act shall acquire such minimum qualification within a period of 5 years.
(Seven) A teacher shall perform his/her duties specified in section 24(1) of the Act and
(Eight) The school shall ensure that the teacher/teacher does not engage himself in private tutoring.

8) The school shall follow the syllabus prepared on the basis of the syllabus prescribed by the competent authority.

9) The school shall admit students against the facilities available in the school as prescribed in section 19 of the Act.

10) The school shall adhere to the standards and norms specified in section 19 of the Act. Facilities available in the school at the time of last inspection were as follows

- ★ Area of school premises :- 10613.63 Sq.mt.
- ★ Total Construction Area :- 4192.28 Sq.mt.
- ★ Play Ground Area :- 6421.35 sq.mt.
- ★ Class Room No. :- 59
- ★ Office-cum-storage-cum-principal's room :- 14
- ★ There shall be sufficient water to keep the toilets in clean and hygienic condition for use of separate toilets for boys and girls :- Yes
- ★ Drinking Water Facility :- Yes
- ★ Kitchen for cooking lunch :- N.A.
- ★ Availability of Teaching Study Literary Materials/ Games and Sports Materials/ Library :-Yes
- ★ Reading material is freely available :-Yes

11) Unapproved classes or units may not be conducted in the name of the school on the school premises or elsewhere.

12) The school building or other structure or playground shall be used only for the purpose of education and skill development.

13) The school is run by a body registered under the Societies Registration Act, 1860 (21 of 1860) or the Bombay Public Trustee System Act, 1950.

14) The school is not run for the benefit of any person, group or association of persons or any other person or for making any profit.

15) The accounts of the school should be audited and certified by a Chartered Accountant and proper accounts should be prepared as per rules. A copy of each statement should be sent to the District Education Officer every year.

16) The accreditation code received by your school is TH-NMMC-P-7. Please note that this should be mentioned in any correspondence with this office.

17) The school shall submit such reports and information as may be required by the Director of Education/District Education Officer from time to time or comply with such instructions as may be given by the Government or the local authority ...

conditions of approval of the school or for remedying the deficiencies in the functioning of the school.

18) Ensure that the registration of the organization is renewed, if any.

19) Other conditions are attached as per Annexure III.

20) In case any complaint arises regarding the documents submitted by the Principal of Zenith International and Petite Kids, Sector- 5, Airoli, Navi Mumbai, Dist. Thane along with the proposal for obtaining RTE Re-Recognition Form No. 2 in his school or if any false and misleading documents are found, the RTE Re-Recognition Form No. 2 issued by this office will be considered cancelled.

(Balasaheb Rakshe)
Educational Officer (Primary)
Zilla Parishad Thane

TRANSLATED BY ME

SUJATA V. JOSHI
ADVOCATE & NOTARY
101/102, Vishal Bldg., Station Road,
Kalwa (W), Thane-400 605.

30 JUN 2025

NOTARY
SUJATA V. JOSHI
Dist. Thane (M.S.)
Regn. No. 10293/13
GOVT. OF INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL